क्र.ला.प्र.वि./लेखा–४/कार्या– साधन सामुग्री दरपत्रके २०२५/3739
मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय.
सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई ४०० ०३०
दूरध्वनी : २४९२ १२१२, फॅक्स– २४९२ ६८८७.
e-mail - acbwebmail@gmail.com.
Tel: 2492 1212, Fax - 2492 6887
Date : 11/04/2025

..... ००दरपत्रकाबाबतच्या सुचना ०० .....

विषय :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.राज्य, मुंबई या कार्यालयातील लेखन सामुग्री खरेदीबाबत.

.......००००....

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई मुख्यालय या कार्यालयाकरिता आवश्यक असलेली लेखनसामुग्री पुरविण्यासाठी सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे इच्छुक पुरवठादार कंपणीकडून कमीत कमी दराची दरपत्रके मोहरबंद पाकीटामध्ये मागविण्यात येत आहेत.याबाबत अटी व शर्ती सविस्तर तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

..... ००अटी व शर्ती०० .....

१ सीलबंध दरपत्रके दिनांक १६/०४/२०२४ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये सायंकाळी १८.१५ वा. पर्यंत कार्यालयात जमा करावी. मुदतीनंतर प्राप्त होणा–या दरपकांचा विचार केला जाणार नाही.

२ मोहोरबंध लिफाप्यांवर “लेखनसामुग्री साहित्यचा पुरवठा करण्याबाबत दरपत्रक” असे लिहिणे आवश्यक आहे. एका पुरवठादारास एकच निविदा सादर करता येईल.

३ दरपत्रक फॉर्मवर दरपत्रक धारकाची सही व शिक्का असणे बंधनकारक आहे.

४ दरपत्रक मोहोरबंध लिफाफे उघडतेवेळी दरपत्रकधारक स्वत: किंवा त्याचा एक प्रतिधिधी स्वखर्चाने उपस्थित राहू शकतो.

५ दरपत्रक कागदपत्रात कुठेही खाडाखोड /ओव्हरराईटिंग (गिरवणे) पांढरी शाई लावणे टाळावे.चुकुन तसे करावे लागल्यास त्यावर पूर्ण स्वाक्षरी करावी.

६ दरपत्रक धारक कंपनीने या कार्यालयातील खरेदी अधिका–यांबरोबर हितसंबंध नसल्याबाबत आणि एकच निविदा दिल्याबाबतचे हमीपत्र दरपत्रकासोबत द्यावे.

७ कोणतेही एक अथवा सर्व दरपत्रके नाकारण्याचा, संपूर्ण प्रक्रिया पूर्णपणे किंवा दरपत्रक स्वीकृतीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता थांबविण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार, हे कार्यालय राखून ठेवत आहे.

८ दरपत्रके दिनांक १७/०४/२०२४ सकाळी ११.०० वाजता अपर पोलीस अधीक्षक मुख्यालय यांचे दालनात उपडण्यात येतील.

९ दरपत्रके स्वीकारण्याबाबतचा अंतिम निर्णय या कार्यालयाचे विभाग प्रमुख यांचा राहील.

Scanned with OKEN Scanner

१० दरपत्र स्वीकृती तारखेपासून लेखन सामुग्री पुरवठा करण्याबाबत पुढील अटी व शर्तीची पुर्तता करणे आवश्यक आहे.

११ मागणी केलेली लेखन सामुग्री निविदेत देण्यात आलेल्या Specification प्रमाणेच असावी

१२ मागणी केलेली लेखन समुग्री तात्काळ २४ तासामध्ये पुरविण्यात यावी.

१३ तसेच सदर लेखन सामुग्रीचे देयके एकत्रित सादर न करता त्या त्यावेळीच देण्यात यावी.जेणेकरुन देयकाची प्रतिपूर्ती वेळेत करणे सोपे जाईल

१४ विहीत वेळेत लेखन सामुग्रीचा पुरवठा न झाल्यास प्रतिदिवशी रु.१००/—प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

१५ Specification प्रमाणे साहित्य पुरवठा न झाल्यास किंवा कमी दर्जाचे साहित्य पुरविल्यास पुरवठा आदेश रद्द करण्यात येईल व कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

तरी मुद्दा क्र १ ते १५ अटी व शर्ती मान्य असेल तर निविदाकाराच्या दरपत्रकाबाबत विचार करण्यात येईल.

**मा. अपर महासंचालक —१ यांच्या मान्यतेने.**

अ.रा.पा. 11/4/25

( अरूण पाटील )
अपर पोलीस अधीक्षक (मुख्यालय—२),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म. राज्य, मुंबई.

प्रति,

सर्व इच्छुक कंपन्या.

प्रत कार्यवाहीस्तव,

पोलीस निरीक्षक, संगणक शाखा, लाप्रवि, म.राज्य, मुंबई.
२/— उपरोक्त पत्राची प्रत सोबत जोडली असून सदरचे पत्र लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे संकेतस्थळावर दि. १५/०४/२०२५ पर्यंत प्रसिध्दी राहील याप्रमाणे प्रसिध्द करण्यात यावे.

Scanned with OKEN Scanner